ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 12 | AUG - 2019

HISTORICITY RESEARCH JOURNAL

'सांगत्ये ऐका' : पुरूष व्यक्तीरेखा : चिकित्सा व विवेचन

व्यंकट बाबूराव सूर्यवंशी
संशोधक विद्यार्थी

प्रास्ताविक :



मराठी चित्रपटसृष्टीतील एक लोकप्रय नायिका म्हणून हंसा वाडकर यांच्याकडे पाहिले जाते. हंसा वाडकर या मुळातच कलावंतिणीच्या घरात २४ जानेवारी १९२३ रोजी मुंबई येथे जन्म झाला. कालावंतिणीच्या घरामध्ये पुरुष किंवा स्त्री कोणीही लग्न करत नसत. परंतू हंसा वाडकर यांच्या आजोबाने ही परंपरा मोडून लग्न केले. तेव्हा खूप हाहाकार माजलेला दिसतो. बालपणीचा काळ सावंतवाडीच्या तांबड्या मातीत सुखाचा गेला. बालपणीचे नाव रतन ठेवले होते. हंसाबाईचे शिक्षण सहावीपर्यंत आर्यन एज्युकेशन सोसायटीच्या शाळेत चालू असताना अजमल हुसेन खॉ साहेब यांच्याकडे गाण्याचे शिक्षण घेतले. घरातील परिस्थितीमुळे शिक्षण सोडावे लागले. त्यानंतर त्या कलाक्षेत्राकडे वळाल्या. 'विजयाची लग्न' या चित्रपटापासून त्यांनी सिनेसृष्टीत पदार्पण केले, तेव्हा त्यांना साळगावकर हे नाव लावले असल्यामुळे घरच्यांनी विरोध केला. त्यांनी आत्याचे वाडकर हे नाव लावले. आम्ही वरेरकरांनी चेहऱ्याची म्हणून हौसा हे नाव ठेवले. यामुळे रतन साळगावकर या हंसा वाडकर झाल्या. अभिनयाचे शिक्षण हंसा वाडकरांना आत्याकडून मिळाले.

हंसा वाडकर १५ वर्षाच्या असताना जगन्नाथ बंदरकर यांच्याशी विवाह झाला. हंसाबाईना लग्न करून सुखी संसार करावा असे खूप वाटायचे पण त्यांच्या वाट्याला हे सुख मिळाले नाही. विवाहापूर्वीच हंसा वाडकर यांच्या वाट्याला गरोदरपणा व गर्भपात आलेला आहे. लग्नानंतर पती बंदरकर संशय घेत या संशयापोटी हमेशा गर्भपात करण्यास त्यांनी भाग पाडले. हंसा वाडकर पति बंदरकराना सोडून हॉटेलमध्ये राहणे पसंद करतात. इतर पुरुषाकडून फसवल्या जातात, तेव्हा बंदरकरांच्या मित्रासोबतच राहून जीवन जगतात.

चित्रपट व रंगभूमीविषयक कार्य :

लग्नाची बेडी या नाटकात रश्मीची भूमिका सातशे वेळा केली आहे व बेबंदशाही या नाटकांमध्ये त्यांनी भूमिका केल्या. विजयाची लग्ने, आत्मना, एअरमेल, दुर्गा (वेडसर मुलीची भूमिका) नवजीवन, आझाद, संत सखु, अपना पराया, मेरे गाव (हिंदी), रामशास्त्री, लोकशाहीर राम जोशी, पाटलाचा पोर, नवरा—बायको, पंढरीचा पाटील, वंशाचा दिवा, पुढचं पाऊल, तमासगिरीण, परिजातक, नायकिणीचा सज्जा, संत जनाबाई, सांगते ऐका, धर्मकन्या इ. चित्रपटांमध्ये हंसा वाडकर यांनी भूमिका केल्या आहेत.

सामाजिक व कौंटुबिक परिस्थितीवर पुरूषप्रधान संस्कृतीचा पगडा असणाऱ्या कुटुंबात जन्माला आल्यापासून ते चित्रपटसृष्टीतील अनूभव या आत्मचरित्रातून मांडले हे. याबरोबरच जीवन जगत असताना अनेक व्यक्तीशी आलेले चांगल्या संबंधाबरोबरच काही वाईट अनुभवही वाट्याला आले आहेत. जे वाईट

अनुभव आले ते फक्त पुरूषी मानसिकता किती खालच्या थरापर्यंत गेलेली हे अनुभव याबरोबरच या आत्मचरित्रात अनेक पुरूष आलेले आहेत. ज्यांच्यामुळे हंसा वाडकर यांच्या जीवनामध्ये अनेक घटना घडण्यासाठी कारणीभूत ठरल्या. त्या पुरूष व्यक्तीरेखावर प्रकाश टाकणार आहोत.

जगन्नाथ बंदरकर :

सावंतवाडीला हंसाबाईच्या घरासमोरच बंदरकरांचे घर होते. लहानपणी हंसाबाईना खूप लाड करायचे आणि विचारायचे माझ्याशी लग्न करणार का, तेव्हा हंसाबाईना या बद्दल काहीही कळायचे नाही. बंदककर हे हंसाबाईपेक्षा दहा वर्षानी मोठे होते. एके दिवशी लग्नाबाबत शपथ घ्यायला सांगतात. मुंबईला हंसाबाईच्या शेजारीच येऊन राहतात. विवाहापुर्वीच हंसाबाईशी शरीरसंबंध आणि गर्भपात या गोष्टी करण्यास भाग पाडतात. लग्न झाल्यावर बंदरकर काही काळ हंसाबाईच्या घरी राहतात. 'चित्रा' मासिकातून मिळणारे उत्पन्न कमी झाल्यावर बंदरकर परत हंसाबाईना चित्रपटक्षेत्रात काम करण्यासंदर्भात विचारत असतात. हंसाबाई बद्दल काहीही खोट्या बातम्या ऐकून ते हंसाबाईवर संशय घेत आणि पट्याने मारहाण करतात आणि हंसाबाईना गर्भपात करण्यास भाग पाडत असतात. या संशयी वृतीतून हमेशा भांडणे होत असल्याने हंसाबाई घर सोडून जातात आणि हॉटेलमध्ये राहणे पसंत करतात. बंदरकरांन एक वेळ शोध घेण्याचा प्रयत्नसुद्धा केला नाही. तेव्हा तिथे एक जोशी नावाच्या गृहस्थाशी ओळख होते आणि त्याच्याकडून फसली जाते. तेव्हा त्या जोश्याला चोरून बंदरकरांना यातून सूटका करण्यासाठी पत्र लिहते. बंदरकर सूटका करतात आणि घरी आल्यावर मात्र हंसाबाईना राहण्याच्याबाबतीत बरेच नियम लावले जातात. तेव्हा बंदरकरांचे मित्र जावळे यांच्यासोबत त्यांची रखेल म्हणून राहण्याचा निर्णय घेतात. तेव्हाही बंदरकराबद्दल म्हणतात, ''एवढं सगळं झालं असलं तरी माझा बंदरकरावर विश्वास हे माझ्या वयाच्या सहाव्या वर्षापासून ते मला ओळखतात. नाही पटले माणसाचे संसारात म्हणून तो मनुष्य वीट आहे असं नाही. मचे धागे जुळू शकले नाहीत. कदाचीत मी त्यांना समजू शकले नाही. बरं वाटतय तर राहू द्या अशी त्यांची वृत्ती आहे. मला खात्री आहे आताही जरी त्यांना कळलं, की मी दु:खात आहे, संकटात आहे तर माझ्यासाठी ते धावून येतील.'' बंदरकर संशयी असले तरी हंसाबाईना जोशींकडून सोडविण्यासाठी मदतीचा हात पुढे करण्याची माणुसकी दाखवण्याचा प्रयत्न करून सूटका केली आहे.

जोशी आणि मॅजिस्ट्रेट :

बंदरकर यांच्या त्रासाला कंटाळून हंसाबाई हॉटेलमध्ये राहण्याचा निर्णय घेतात. त्या हॉटेलमध्ये जोशी या गृहस्थाची ओळख होते. हंसा वाडकरांना दारूचे व्यसन लागलेलेच होते. जोशी आणि हंसा वाडकर दोघेही दारू पितात यातूनच यांची चांगली ओळख होते. जोशी सांगेल तसे हंसाबाई करत असतात आणि ते दोघेही फिरत असतात. एक दिवस जोशी आपल्याकडील पैसे संपले सांगून हंसा वाडकरांना मराठवाड्यात गावाकडे घेऊन जातो. तीन वर्ष घरात मोलकरीन म्हणून डांबून ठेवतो. जोश्यांना अगोदरच दोन बायका असतात. एक वारलेली असते आणि हंसा वाडकर या चौथ्या असतात. एके दिवशी रात्री बाहेर पडण्याच्या तयारीत असताना बंदरकर पाहतो आणि चूलीतील लाकडाने मारहाण करत असतो. गावात फुगे—पिना—सुया विकायला आलेल्या बाईकडे चिठ्ठी लिहून पोष्टात टाकण्यासाठी देतात व बाहेर पडण्यासाठी त्या चोरून बंदरकरांना पत्र पाठवतात आणि सुटका करून घेताना बंदरकर पोलिस घेऊन येतात व सुटका करून घेऊन जाताना माझी कोणाविरूद्ध तक्रार नाही म्हणून कागदपत्रे करण्यासाठी मॅजिस्ट्रेटकडे जातात. तेव्हा मॅजिस्ट्रेट बंदरकरांना कागदपत्रे आणायला बाहेर पाठवतो. घरात मुलं, पत्नी असताना सुद्धा मॅजिस्ट्रेट हंसा वाडकर यांच्यावर बळजबरीने शरीर संबंध ठेवण्यास भाग पाडतो व उपभोग घेतो. तेव्हा बलात्कार कसा असतो ते यांनी प्रत्यक्ष अनुभवले होते. एखाद्या चित्रपटात चित्र निर्माण करावे अशी परिस्थिती स्वत:च्या जीवनातच अनुभवाला येईल असं प्रत्यक्षात वाटले नसावे पण आपल्या तावडीत सापडलेल्या स्त्रीचा उपयोग घेणार नाही तो पुरूष कसा असेल असचं म्हणावे लागेल. या आत्मचरित्रातून आलेले जोशी हे व्यसनी व वासनांध प्रतिमा असलेला व मॅजीस्ट्रेट हे समाजातील स्त्रीचा फायदा घेणारे पुरूष प्रतिनिधी असल्याचे दिसते. ज्या व्यक्तीकडून अन्याय झाल्यानंतर न्यायाची अपेक्षा

ज्याच्याकडून ठेवावे त्याच्याकडूनच एखाद्या स्त्रीच्या मजबूरीची फायदा घेणारा पुरूष तसेच स्त्रीकडे उपभोगाची वस्तू म्हणून पाहिले जाते.

राजन जावळे :

बंदरकरांचे मित्र जेव्हा हॉटेलमध्ये राहण्याचा निर्णय घेतात, तेव्हापासून हंसा वाडकर जावळेच्या संपर्कात राहतात. जोशींकडून परत आल्यावर त्यांच्या राहणीमानात बंदरकरांनी जास्त निर्बंध आणल्यामुळे राजन जावळेशी संपर्क साधून त्यांच्यासोबत राहण्याचा निर्णय घेतात. जावळेची आई हंसा वाडकरला स्विकारतात. जावळे हंसा वाडकरांना समजून घेऊन योग्य वेळी आधार देण्याचे, मदतीचा हात पुढे करण्याचे काम जावळे करत असतात. एकंदरीत पुरूषाची मानसिकता ही स्त्री उपभोगाची वस्तू असाच दिसत आहे. तसेच येथे आलेला जोशी हा समाजातील स्त्रीचा फायदा उठवणारा नायक वाटतो. स्त्रीच्या असहायतेचा फायदा घेणारा समाज हा आपली मानसिकता कधी बदलणार हा प्रश्न अजूनही अनुत्तरीत आहे. त्यांना आलेल्या सर्व पुरूषांचा अनुभव हा वाईट व पुरूषी मानसिकतेने ग्रासलेला आहे. एकंदरीत हंसा वाडकर यांच्या आत्मचरित्राचा विचार केल्यावर यातून येणारे पुरूषाच्या चित्रणाचा अभ्यास केल्यावर स्त्रीकडे भोगदासी म्हणून पाहिल्याचे दिसते.

संदर्भ :

१. 'सांगत्ये ऐका' हंसा वाडकर, राजहंस प्रकाशन, पुणे, आ.जुलै २०१५.
२. जयंत वष्ट, स्वातंत्र्योत्तर आत्मचरित्र, प्रदक्षिणा, खंड दुसरा, संपा.अनिरूध्द कुलकर्णी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्र.आ.१९९१
३. डॉ.रविंद्र शोभणे, त्रिमिती, विजय प्रकाशन,, नागपूर, प्र.आ.२०१३,
४. द.न.गोखले, चरित्र—चिंतन, मौज प्रकाशनगृह, मुंबई, प्र.आ.२०००, प्रस्तावना